Book - Post

प्रति,
श्रीमान / प्रा.

प्रेषक :
**प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार**
कार्याध्यक्ष, महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद
'आई', शिवनगर, सूतमील रोड, लातूर.
भ्रमणध्वनी : ९४२२९४९९६६

॥ प्रदीपः सर्वविद्यानाम् ॥

# महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद

(नों. क्र. महाराष्ट्र / ४११२) कोल्हापूर
सार्वजनिक न्यास नों. क्र. के. एफ–४१५३

॥ प्रदीपः सर्वविद्यानाम् ॥

: पत्रव्यवहाराचा पत्ता :
**प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार**
कार्याध्यक्ष, महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद
'आई', शिवनगर, सूतमील रोड, लातूर.
भ्रमणध्वनी : ९४२२९४९९६६

- अध्यक्ष : **डॉ. ज. रा. दाभोळे**
- कार्याध्यक्ष : **डॉ. नागोराव कुंभार**
- उपाध्यक्ष : **डॉ. सुरेंद्र गायधने, प्रा. सुनील गवरे, प्रा. डॉ. सुनील साळुंके**
- खजिनदार : **प्रा. डॉ. सुधीर पिटके**
- कार्यवाह : **डॉ. हेमलता मोरे, डॉ. सुनील काळमेघ, डॉ. संगीता पांडे**
- सदस्य : **डॉ. मोहन देशमुख, प्रा. ए.पी. सिंग, प्रा. विजय कंची, प्रा.नामदेव फापाळे, प्रा.डॉ. प्रभाकर किर्तनकार, प्रा. अमन बगाडे.**
- सल्लागार : **डॉ. सुभाषचंद्र भेलके, श्री उद्गम विकासांत, प्रा. एस. आर. वाघमोडे, डॉ. स. गो. निगळ**

## महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद ३३ वे अधिवेशन
## २०१६–२०१७

स.न.वि.वि.

महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे ३३ वे अधिवेशन दि. १० नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २०१६ या कालावधीत **स्वा. सै. सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा (जं), जि. परभणी** येथे भरविले जाणार आहे. तरी सर्व तत्त्वज्ञानप्रेमींना या अधिवेशनासाठी स्नेहपूर्वक निमंत्रण!

**सदर अधिवेशनात :**

१) उत्तर आधुनिकतावाद

२) संत जनाबाईंचे तत्त्वज्ञान

या दोन पूर्व नियोजित विषयांवर परिसंवाद होतील आणि त्यात निमंत्रित अभ्यासक निबंध सादर करतील. याशिवाय व्यक्तिगत निबंधवाचनाची सत्र होतील.

निबंधलेखकांनी आपला निबंध दि. ३० ऑक्टोबर २०१६ पूर्वी अधिवेशनाचे स्थानिक सचिव **प्रा. डॉ. प्रभाकर किर्तनकार, स्वा. सै. सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा, जि. परभणी,** Email : kirtankarpr@gmail.com मो-९०११९४३८४८ या पत्त्यावर पाठवावा. निबंध शक्यतो मराठी भाषेतून असावा. मात्र मराठी भाषा अवगत नसल्यास हिंदी अथवा इंग्रजी भाषेतील चालू शकेल. सादर करण्याच्या दृष्टिने निबंध अटोपशीर असावा. निबंधाचा गोषवारा मात्र २५ ऑक्टोबर २०१६ पूर्वी पोहचेल अशा बेताने पाठवावा. निमंत्रक संस्था एक स्मरणिका प्रसिद्ध करणार असून केवळ मुदतीत आलेल्या निबंधांचे गोषवारे त्यात समाविष्ट होतील. ज्यांना निबंधाच्या प्रती वितरित करावयाच्या आहेत, त्यांनी त्या स्वतः सोबत आणाव्यात.

अधिवेशनाला आपण उपस्थित राहणार असल्याचे स्थानिक सचिवांना दि. ३० ऑक्टोबर २०१६ पर्यंत कळवावे. म्हणजे सदस्यांसाठी निवास, अल्पोपहार, भोजन इत्यादी व्यवस्था करणे संयोजकांसाठी शक्य होईल. अधिवेशनास उपस्थित राहणाऱ्या प्रत्येक सभासदाने अधिवेशन सहभाग शुल्क रु. १०००/- भरणे आवश्यक आहे. हे शुल्क जेष्ठ नागरिकांसाठी रु. ७००/- तर विद्यार्थ्यांसाठी रु. ५००/- राहील. सदर शुल्क स्थानिक सचिवांकडे डिमांड ड्राफ्ट/मनिऑर्डरने पाठवावे किंवा अधिवेशनाच्या वेळी रोखीने भरावे. डिमांड ड्राफ्ट **महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद, ३३ वे अधिवेशन** या नावाने **पूर्णा** येथे देय काढावा. जे सभासद अधिवेशनास उपस्थित राहू इच्छिण्याची सूचना देतील त्यांना स्थानिक सचिवांकडून अधिवेशनाच्या व्यवस्थेसंदर्भातील पत्र लवकरच पाठवले जाईल. विद्यार्थी सभासदांनी स्वतः कळविणे योग्य होईल.

**खालील सूचना कृपया लक्षात घ्याव्यात :**

**१) सभासदत्व :**

अधिवेशनात भाग घेणारे सर्वजण परिषदेचे सदस्य असणे आवश्यक आहे. वार्षिक सदस्यत्त्व शुल्क १००/- (विद्यार्थ्यांसाठी ५०/-) आहे. आपण आजीव सदस्य नसल्यास अवश्य व्हावे. (आजीव सदस्यत्व शुल्क १०००/- आहे.) आपण स्वतः आजीव सदस्य असल्यास इतर तत्त्वज्ञान प्रेमींनाही आजीव सदस्य होण्यास प्रवृत्त करावे ही विनंती. परिषदेचे सदस्यता शुल्क **प्रा. डॉ. सुधीर पिटके, कोषाध्यक्ष, मतप- 'गायत्री' संभाजीराजे नगर, फलटण जि. सातारा-४१५ ५२३ (मो-९९७५६७५९३५)** या पत्त्यावर पाठवावे किंवा अधिवेशनाच्या वेळी भरावे.

**२) प्राध्यापक सभासदांसाठी :**

ज्या प्राध्यापक सभासदांना महाविद्यालयाकडून अधिवेशनासाठी कार्यरजा मंजूर होणे व अन्य सवलती मिळविणे यासाठी प्राचार्यांना उद्देशून परिषदेचे पत्र आवश्यक असेल तर त्यांनी मला माझ्या पत्त्यावर कळवून तशा प्रकारचे पत्र मागवून घ्यावे.

**३) विद्यार्थी निबंध सादरीकरण स्पर्धा :**

दरवर्षीप्रमाणे अधिवेशनात दि. १२-११-२०१६ रोजी विद्यार्थी निबंध सादरीकरण स्पर्धा होईल. नियमावली व अर्जाचा मसुदा यासाठी **प्रा. डॉ. ग्यानदेव उपाडे, बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी, मो. नं. ९७६५८८७७५८** यांच्याशी संपर्क साधावा. प्राचार्यांच्या दाखल्यासह तो अर्ज भरुन किंवा साध्या कागदावर पूर्ण लिहून विद्यार्थी स्पर्धकांनी सोबत आणणे आवश्यक आहे. ही स्पर्धा कुठल्याही विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे :

१) भारतातील सहिष्णुता व असहिष्णुता
२) नैतिक मूल्यांची घसरण : कारणे व उपाय
३) देहदंड : समर्थनीय की असमर्थनीय

**४) विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धा :**

दि. १२-११-२०१६ रोजी कुठल्याही विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांसाठी खुली असणारी वक्तृत्व स्पर्धा घेतली जाईल. नियमावली व अर्जाचा मसुदा यासाठी **प्रा. माधव कांबळे, संभाजी केंद्रे महाविद्यालय, जळकोट जि. लातूर. मो-९४२२२२४४८०** यांच्याशी संपर्क साधावा. प्राचार्यांच्या दाखल्यासह तो अर्ज भरुन किंवा साध्या कागदावर पूर्ण लिहून विद्यार्थी स्पर्धकांनी सोबत आणणे आवश्यक आहे. या स्पर्धेसाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१) माझ्या स्वप्नातील महाराष्ट्र
२) मला शिक्षक व्हायचय.
३) भारतीय सामाजिक स्त्री पुरुष समानता

**५) खुली निबंध** स्पर्धा :

यंदाची कै. विश्वनाथ विनायक ओक खुली निबंध स्पर्धा 'संत तुकाराम महाराजांचे समाज प्रबोधन' या विषयावर आयोजित करण्यात आली आहे. नियमावलीसाठी **प्रा. अमन बगाडे, न्यु आर्टस् कॉलेज, अहमदनगर, मो. ८६००५५७३९३** यांच्याशी संपर्क साधावा. निबंध पाठवण्याची अंतिम तारीख ३० ऑक्टोबर २०१६ आहे.

६) सदर अधिवेशनाचे अध्यक्षस्थान अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष **प्रा. डॉ. सदानंद मोरे,** सेवानिवृत्त तत्त्वज्ञान विभाग प्रमुख सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ हे भूषविणार आहेत.

७) कृपया या वेबसाईटवर भेट द्यावी- www.maharashtra philosophy conference.com

**८) सर्वसाधारण सभा :**

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी सायंकाळी परिषदेची सर्वसाधारण सभा होईल.
सभेपुढील विषय :

१. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. मतपच्या २०१५-२०१६ या वर्षाच्या जमा खर्चास मंजूरी देणे.
३. परिषदेच्या ३४ व्या अधिवेशनाची जागा निश्चित करणे व निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, परिसंवादाविषयी चर्चा करणे.
४. सर्वसाधारण कार्यकारीणी निवडणूक.
५. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय.

**प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार**
कार्याध्यक्ष, महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद